ICE 'n' SPICE
व्हेज रेस्टॉरन्ट
पंजाबी डिशेस् । पावभाजी । चाईनीज । ज्युसेस् । आईस्क्रीम
गोदावरी कॉम्प्लेक्स,व्ही.आय.पी.रोड,नांदेड
मो. 9422172572, 9850430189

सायं दैनिक
# नांदेड वार्ता
www.nandedwarta.com

•वर्ष २४ वे • अंक २२८ • सोमवार दि.८ जून २०२६ • नांदेड • पोस्ट परवाना क्र.जी.-२/आरएनपी/एनएनडी-२६२/२०२३-२०२५ • पाने ४ • किंमत १ रु.

## केंद्र सरकारविरोधात इंडिया आघाडीचे रणशिंग

### 'नीट'सह पाच मुद्यांवर सरन्यायाधीशांना पत्र लिहिणार



नवी दिल्ली:नीट सह सीबीएससी व अन्य परीक्षांचे पेपरफुटी, मतदानातील फेरफार, वाढती महागाई यासह पाच मुद्यांवर केंद्र सरकार विरोधात टीकास्त्र डागत सरन्यायाधीशांना पत्र पाठवणार असल्याचे इंडिया आघाडीच्या वतीने काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष मल्लिकार्जुन खर्गे यांनी सांगितले.

सत्ताधारी एनडीए सरकारविरोधात स्थापन झालेल्या इंडिया आघाडीची नवी दिल्ली येथे महत्त्वपूर्ण बैठक पार पडली. आगामी लोकसभा आणि विविध राज्यांतील विधानसभा निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर झालेल्या या बैठकीत केंद्र सरकारच्या धोरणांवर तीव्र टीका करण्यात आली. या बैठकीला काँग्रेसचे नेते राहुल गांधी, तृणमूल काँग्रेसच्या ममता बॅनर्जी, राष्ट्रवादी काँग्रेस (शरदचंद्र पवार गट)च्या खा.सुप्रिया सुळे, समाजवादी पक्षाचे अध्यक्ष अखिलेश यादव, राष्ट्रीय जनता दलाचे नेते तेजस्वी यादव, नॅशनल कॉन्फरन्सचे ओमर अब्दुल्ला, पीडीपीच्या मेहबुबा मुफ्ती तसेच भारतीय कम्युनिस्ट पक्षाचे राष्ट्रीय सचिव डी.राजा यांच्यासह डाव्या पक्षांचे वरिष्ठ नेते उपस्थित होते. विरोधी पक्षांची एकजूट कायम ठेवण्याबरोबरच आगामी राजकीय रणनीतीवरही बैठकीत चर्चा झाल्याचे सांगण्यात आले. बैठकीनंतर पत्रकार परिषदेत बोलताना खर्गे यांनी मतदान प्रक्रियेतील कथित गैरप्रकारांचा मुद्दा अत्यंत गंभीर असल्याचे सांगितले. या संदर्भात देशाच्या सरन्यायाधीशांना पत्र लिहून आवश्यक हस्तक्षेप व चौकशीची मागणी करण्यात येणार असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. लोकशाही प्रक्रियेवरील जनतेचा विश्वास अबाधित राहण्यासाठी निवडणूक व्यवस्थेतील प्रत्येक शंकेचे निरसन होणे गरजेचे असल्याचे मतही त्यांनी व्यक्त केले. शैक्षणिक क्षेत्रातील गोंधळावरही इंडिया आघाडीने केंद्र सरकारला धारेवर धरले. नीट आणि व सीबीएसई परीक्षांबाबत विद्यार्थ्यांमध्ये निर्माण झालेल्या संभ्रमाची जबाबदारी स्वीकारत केंद्रीय शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान यांनी राजीनामा द्यावा, अशी मागणी बैठकीत पुन्हा एकदा करण्यात आली. विद्यार्थ्यांच्या भवितव्याशी संबंधित विषयांमध्ये पान ४ वर

## जोरदार पावसाचा १७ राज्यांना इशारा

मुंबई/प्रतिनिधी-केरळ मध्ये दाखल झाल्यानंतर मान्सून आता तळकोकणापर्यंत पोहोचला असून राज्यातील अनेक भागांत पावसाने हजेरी लावण्यास सुरुवात केली आहे. दरम्यान, भारतीय हवामान विभागाने पुढील २४ तासांसाठी महाराष्ट्रासह देशातील १७ राज्यांना जोरदार पाऊस, वीजांचा कडकडाट आणि वेगवान वाऱ्यांचा इशारा दिला आहे.

हवामान विभागाच्या अंदाजानुसार काही भागांमध्ये ताशी ८० ते ९० किलोमीटर वेगाने वारे वाहण्याची शक्यता असून नागरिकांनी विशेष सतर्कता बाळगण्याचे आवाहन करण्यात आले आहे. मान्सूनच्या प्रगतीमुळे उष्णतेच्या तीव्र झळांपासून दिलासा मिळत असला तरी अनेक ठिकाणी वादळी पावसाचा फटका बसण्याची शक्यता व्यक्त करण्यात आली आहे. महाराष्ट्रातील कोकण पट्ट्यात मान्सून सक्रिय झाल्याने वातावरणात लक्षणीय बदल झाला आहे. राज्यातील विविध भागांत ढगाळ वातावरणासह अधूनमधून पावसाच्या सरी कोसळत आहेत. हवामान विभागाने महाराष्ट्रासोबत केरळ, गोवा, उत्तर प्रदेश, बिहार, पश्चिम बंगाल, झारखंड, ओडिशा, सिक्कीम, हिमाचल प्रदेश, उत्तराखंड, तामिळनाडू, मणिपूर, त्रिपुरा, पुदुचेरी, अंदमान-निकोबार बेटे आणि लडाख या राज्यांमध्येही पावसाचा प्रभाव वाढण्याचा अंदाज वर्तवला आहे.या राज्यांतील काही भागांमध्ये मध्यम ते जोरदार पाऊस पडण्याची शक्यता असून वादळी वाऱ्यांमुळे झाडे उन्मळून पडणे, वीजपुरवठा खंडित होणे तसेच स्थानिक वाहतुकीवर परिणाम होण्याची शक्यता व्यक्त करण्यात आली आहे. विशेषतः समुद्रकिनारी भाग, मोकळी मैदाने आणि उंच झाडांच्या परिसरात राहणाऱ्या नागरिकांनी सावध राहण्याचा सल्ला हवामान विभागाने दिला आहे.

## महागाईचा तिहेरी झटका; सीएनजीच्या दरात वाढ

नवी दिल्ली: पेट्रोल-डिझेल, घरगुती गॅसच्या दरातील वाढी पाठोपाठ केंद्र सरकारने आता सीएनजी दरातही वाढ केल्याने सर्वसामान्यांना महागाईचा तिहेरी झटका बसला आहे. याचे परिणाम आता घरगुती खर्चापासून प्रत्येक वस्तुंच्या दरवाढीत जाणवणार असल्याचे मत अर्थतज्ञ व्यक्त करीत आहेत.

इराण-अमेरिका संघर्षाच्या पार्श्वभूमीवर जागतिक ऊर्जा बाजारात निर्माण झालेल्या अस्थिरतेचा फटका आता भारतीय नागरिकांना बसू लागला आहे. पेट्रोल-डिझेल, एलपीजी गॅस सिलेंडर आणि सीएनजीच्या दरात झालेल्या मोठ्या वाढीमुळे महागाईचा नवा भडका उडाला असून सर्वसामान्यांच्या खिशाला मोठी झळ बसत आहे. घरगुती बजेटपासून ते वाहतूक खर्चापर्यंत प्रत्येक क्षेत्रावर या दरवाढीचा परिणाम दिसून येत आहे. गेल्या काही आठवड्यांत झालेल्या चार टप्प्यातील वाढीनंतर पेट्रोल आणि डिझेल अंदाजे ७.५० रुपये प्रति लिटरने महागले आहे. त्यामुळे खासगी वाहनधारकांसह मालवाहतूक क्षेत्रावरही अतिरिक्त आर्थिक भार पडला आहे. जागतिक बाजारातील अस्थिरतेमुळे ७ मार्च रोजी सिलेंडरच्या दरात ६० रुपयांची वाढ करण्यात आली आणि किंमत ९१३ रुपयांवर पोहोचली. त्यानंतर जून महिन्यात आणखी २२ रुपयांची वाढ झाल्याने घरगुती एलपीजी सिलेंडरचा दर आता ९४२ रुपयांवर गेला आहे. तज्ज्ञांच्या मते, मध्यपूर्वेतील संघर्ष आणि कच्च्या तेलाच्या वाढत्या किमतींमुळे ऊर्जा क्षेत्रावर दबाव कायम राहण्याची शक्यता आहे. त्यामुळे आगामी काळात इंधन आणि गॅसच्या दरात आणखी वाढ होण्याची भीती व्यक्त केली जात आहे.

## विषमता विरोधी लढ्यात शत्रु मित्र विवेकाची गरज:कॉ.स्मिता पानसरे

नांदेड/प्रतिनिधी-केंद्र व राज्यातील सत्ताधाऱ्यांकडून जाणीवपूर्वक समाजात फूट पाडून विषमता निर्माण केली जात आहे. वाढत्या विषमतेविरोधात शत्रू-मित्र विवेक लक्षात घेऊन सर्व विरोधी शक्तींनी संघटित लढा उभारण्याची गरज आहे, असे प्रतिपादन भारतीय कम्युनिस्ट पक्षाच्या नेत्या व व्याख्यात्या स्मिता पानसरे यांनी केले.

वंचित बहुजन आघाडीचे राज्य प्रवक्ते फारुख अहमद लिखित 'मुसलमानों का सियासी अजेंडा' या पुस्तकावर आयोजित परिसंवादात त्या प्रमुख वक्त्या म्हणून बोलत होत्या. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी बालाजी थोटवे होते. यावेळी ॲड. प्रदीप नागापूरकर, ज्येष्ठ उर्दू पत्रकार अल्ताफ सहानी, मराठवाडा साहित्य परिषदेचे जिल्हाध्यक्ष बालाजी वितवार, एमपीजेचे अल्ताफ हुसेन तसेच मराठा सेवा संघाचे सूर्यवंशी यांची प्रमुख उपस्थिती होती.



कॉ. स्मिता पानसरे म्हणाल्या की, केवळ मुस्लीम समाजालाच विकासापासून वंचित ठेवण्यात आलेले नाही, तर कामगार, कष्टकरी, शेतकरी आणि शेतमजूर हे देखील विषमतेच्या खाईत लोटले गेले आहेत. त्यामुळे केवळ मुस्लीम समाजाने नव्हे, तर संपूर्ण कष्टकरी व वंचित समाजाने राजकारणाबाबत फेरविचार करण्याची गरज आहे. वाढत्या विषमतेविरोधात राजकीय पक्षांनी दिवंगत विचारवंत गोविंद पानसरे यांनी मांडलेला शत्रू-मित्र विवेक आचरणात आणून संघटित संघर्ष उभारला पाहिजे, असेही त्यांनी नमूद केले. पुस्तकाचे लेखक फारुख अहमद यांनी या पुस्तकात मुस्लीम पान ४ वर

## काँग्रेसचे गटनेते अमित आरसुळ यांच्या 'त्या' स्टेटसमुळे हदगावमध्ये राजकीय वर्तुळात खळबळ!

हदगाव/प्रतिनिधी-निवडणुका कोणत्याही असो,हदगाव तालुका नेहमीच आपल्या वेगळ्या राजकीय समीकरणांमुळे चर्चेत असतो. सध्या विधान परिषदेच्या स्थानिक प्राधिकारी मतदारसंघाच्या निवडणुकीची रणधुमाळी सुरू असतानाच, हदगाव नगर परिषदेचे माजी नगराध्यक्ष तथा काँग्रेसचे गटनेते अमित आरसूळ यांच्या एका सोशल मीडिया स्टेटसने राजकीय वर्तुळात मोठी खळबळ उडवून दिली आहे. त्यांनी ठेवलेल्या अब आयेगा मजा या स्टेटसचे अनेक राजकीय अर्थ काढले जात असून, सध्या तालुक्यात याचीच चर्चा रंगली आहे.



येत्या १८ जून २०२६ रोजी विधान परिषदेसाठी मतदान होणार आहे. या निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर अमित आरसूळ यांचे हे स्टेटस अत्यंत महत्त्वाचे मानले जात आहे. हे स्टेटस कुणाला उद्देशून आहे, याबाबत आरसूळ यांच्याशी संपर्क साधला असता, त्यांनी नेहमीच्या शैलीत उत्तर दिले. मला सहज सुचलं म्हणून मी हे स्टेटस ठेवलं 'असे सांगत त्यांनी अधिक बोलणे टाळले. मात्र, आपण अगदी योग्य टाइमिंग साधलं हे सांगायला देखील ते विसरले नाहीत. त्यामुळे या स्टेटसच्या मागे नक्कीच काहीतरी मोठी राजकीय खेळी दडली असल्याचा अंदाज वर्तवला जात आहे. या चर्चेला उधाण येण्यामागे एक मोठे राजकीय पार्श्वभूमी आहे. पण दिसून येत आहे महाविकास आघाडीतर्फे शिवसेना (ठाकरे गट) पक्षाचे हिंगोलीचे खा.नागेश पाटील आष्टीकर यांचे सुपुत्र कृष्णा पाटील आष्टीकर हे नांदेड स्थानिक स्वराज्य संस्था मतदारसंघात महाविकास आघाडीचे उमेदवार म्हणून निवडणूक रिंगणात आहेत. महायुतीचे उमेदवार अमरनाथ राजूरकर यांच्या विरोधात निवडणूक रिंगणात आहेत. विशेष म्हणजे हदगाव विधानसभा क्षेत्राचे तत्कालीन आ. नागेश पाटील आष्टीकर यांनी माजी नगराध्यक्ष अमित आरसूळ यांची त्या वेळी पान ४ वर

## जुना गंज भागातून पोलीसांनी केला साडेचार लाखांचा गुटखा जप्त

नांदेड/प्रतिनिधी-जुन्या नांदेड शहरातील जुना गंज भागात स्थानिक गुन्हा अन्वेषण विभागाच्या पोलीसांनी रविवारी दुपारी धाड टाकुन साडेचार लाख रुपयांचा गुटखा जप्त केला आहे. याप्रकरणी एका जणास पोलीसांनी अटक केली.

पोलीस अधीक्षक अबिनाशकुमार, अतिरिक्त पोलीस अधीक्षक सुरज गुरव यांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हा अन्वेषण विभागाच्या पथकाकडून अवैध धंद्याविरुध्द कारवाई चालू आहे. जुना गंज भागात शासनाने बंदी घातलेला गुटखा विक्री होत असल्याची माहिती स्थानिक गुन्हा अन्वेषण विभागाच्या पोलीसांना मिळाली. पोलीस निरिक्षक अतुल भोसले यांच्या मार्गदर्शनाखाली सपोनी विठ्ठल घोगरे व पोलीस कर्मचारी रविवारी दुपारी जुना गंज भागातील फेमस हॉटेलच्या बाजुला एक इसम गुटखा विक्री करीत होता. पोलीसांनी त्यास ताब्यात घेवून तपासणी केली असता त्याठिकाणी शासनाने प्रतिबंधीत केलेल्या विविध कंपनीचा चार लाख पन्नास हजार रुपयांचा गुटखा पोलीसांना आढळून आला. पोलीसांनी मोहम्मद अल्ताफ शेख छोटेमिया (वय २३) रा.देगलूर नाका,नांदेड यास अटक केली. सदरील गुटख्याबाबत पोलीसांनी आरोपीकडे चौकशी केली असता त्याने म्हैंसा जि.निर्मल (तेलंगणा) येथील शेख जुबेर शेख खदीर याच्याकडून खरेदी केल्याचे सांगितले. याप्रकरणी इतवारा पोलीस ठाण्यात दोन जणांविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

## लाच न दिल्याची शिक्षा:जमिनीच्या नोंदीसाठी १० वर्षांपासून वृद्ध शेतकऱ्याची फरफट!

### अडीचशे फेऱ्या मारुनही न्याय नाही;आता दिला आत्महत्येचा इशारा

किनवट/प्रतिनिधी-सरकारी काम आणि दहा वर्षे थांब या म्हणीचा जीवंत प्रत्यय सध्या किनवट तहसील कार्यालयात पाहायला मिळत आहे. कॉम्प्युटर ऑपरेटर आणि महसूल कर्मचाऱ्यांच्या एका 'नजरचुकीची' शिक्षा मोजताना मरणयातना काय असतात, हे मौजे पार्डी (खु.) येथील एका वृद्ध शेतकऱ्याला विचारल्यास त्याचे उत्तर डोळ्यात पाणी आणणारे ठरेल. जमीन स्वतःच्या मालकीची, सगळे पुरावे पदरात, पण केवळ अधिकाऱ्यांनी मागितलेली १ लाख रुपयांची लाच दिली नाही म्हणून गेल्या १० वर्षांपासून हे प्रकरण थंड बस्त्यात गुंडाळून ठेवण्यात आले आहे.

अर्जदार शेतकरी गंगाधर रामराव केंद्रे (रा. बोधडी खु., ता. किनवट) यांनी सन १९७२ मध्ये मौजे पार्डी (खु.) येथील शेत सर्व्हे क्र. ३ मधील ९ एकर जमीन कायदेशीररीत्या खरेदी केली होती. सन २०१० पर्यंत शासकीय दप्तरी या जमिनीची नोंद अगदी व्यवस्थित 'भोगवटादार वर्ग-१' (मालकी हक्क) अशीच होती. परंतु, सन २०१६-१७ च्या दरम्यान जेव्हा सातबारा ऑनलाईन करण्याचे काम सुरू झाले, तेव्हा किनवट तहसील कार्यालयातील संबंधित कर्मचारी आणि तत्कालीन तलाठ्यांनी संगनमताने, कोणतीही पूर्वसूचना न देता या जमिनीची नोंद चुकीच्या पद्धतीने थेट 'भोगवटादार वर्ग-२' (शासकीय/अटी शर्तींची जमीन) अशी करून टाकली.

आपल्याच मालकीच्या जमिनीचा वर्ग बदलल्याचे पाहून हादरलेल्या गंगाधर केंद्रे यांनी दुरुस्तीसाठी तात्काळ धावपळ सुरू केली. फाईल मधील तक्रार अर्जानुसार, या गंभीर चुकीची दुरुस्ती करण्यासाठी महसूल विभागातील संबंधित कर्मचाऱ्यांनी त्यांच्याकडे तब्बल एक लाख रुपये लाचेची मागणी केली. मी लाच देऊ न शकल्यामुळेच माझे काम जाणीवपूर्वक प्रलंबित ठेवण्यात आले आणि प्रशासनाने माझी दिशाभूल केली, असा खळबळजनक आरोप वृद्ध शेतकऱ्याने थेट महसूल मंत्र्यांकडे केला आहे.एका चुकीच्या नोंदीमुळे शेतकऱ्याला गेल्या १० वर्षांत २५० पेक्षा जास्त वेळा तहसील कार्यालय, तलाठी आणि लिपिकांचे उंबरठे झिजवावे लागले आहेत. फाईल नुसार, २४ मे २०२४ रोजी दिलेल्या अर्जावर केवळ एक 'सुनावणीची नोटीस' काढायला प्रशासनाला तब्बल एक वर्ष लागले. सुनावणी नोटीस दि. १८ जून २०२५ रोजीची आहे). ही संथ गती म्हणजे शेतकऱ्याच्या जखमेवर मीठ चोळण्याचाच प्रकार आहे.

वयोमानानुसार आता सरकारी कार्यालयांचे उंबरठे झिजवणे आणि ही पायपीट सहन करणे अशक्य झाल्याचे गंगाधर केंद्रे यांनी म्हटले आहे. जर शासनाने या प्रकरणात तातडीने न्याय दिला नाही, तर माझ्याकडे आत्महत्या करण्याशिवाय दुसरा कोणताही पर्याय उरणार नाही, असा थेट इशारा त्यांनी दिला आहे. या प्रकरणी भ्रष्ट अधिकारी, तहसीलदार आणि संबंधित तलाठ्यांची कडक चौकशी करून त्यांच्यावर कठोर कायदेशीर कारवाई करण्याची मागणी आता जोर धरू लागली आहे. आता पाहायचे हेच की, या हतबल शेतकऱ्याची आर्त हाक ऐकून जिल्हाधिकारी आणि महसूल मंत्री या 'ढिम्म' प्रशासनाला जागे करणार की आणखी एका शेतकऱ्याचा बळी जाण्याची वाट पाहणार ?, असा संतप्त सवाल आहे.


## भुजबळांऐवजी राजेंद्र जैन राष्ट्रवादीचे राज्यसभा उमेदवार

मुंबई/प्रतिनिधी-राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार गट) कडून रिक्त झालेल्या राज्यसभेच्या जागेसाठी अखेर विदर्भातील ज्येष्ठ नेते राजेंद्र जैन यांच्या नावावर शिक्कामोर्तब करण्यात आले आहे. त्यामुळे राज्यसभेसाठी इच्छुक असलेल्या पक्षाचे ज्येष्ठ नेते छगन भुजबळ यांना यावेळी संधी मिळालेली नाही. पक्षाच्या कोअर कमिटीच्या बैठकीत हा निर्णय एकमताने घेण्यात आल्याची माहिती प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरे यांनी दिली.

# कॉकरोच ते जनआंदोलन: तरुणांच्या असंतोषाचा आवाज

**लोकशाही व्यवस्थेत जनतेचा आवाज कितीही दुर्लक्षित करण्याचा प्रयत्न झाला, तरी तो एखाद्या ना एखाद्या माध्यमातून व्यक्त होतच असतो. गेल्या काही महिन्यांपासून देशातील विविध स्पर्धा परीक्षा, प्रवेश परीक्षा आणि भरती प्रक्रियांमध्ये झालेल्या कथित गैरव्यवहारांमुळे विद्यार्थ्यांमध्ये तीव्र असंतोष निर्माण झाला आहे. नीट परीक्षेतील वाद, विविध पेपरफुटीची प्रकरणे, तसेच परीक्षा व्यवस्थेतील पारदर्शकतेवर निर्माण झालेले प्रश्न यामुळे लाखो विद्यार्थ्यांच्या भविष्याबाबत चिंता व्यक्त केली जात आहे. अशा पार्श्वभूमीवर कॉक्रोज जनता पार्टीच्या वतीने दिल्लीतील जंतर-मंतर मैदानावर आयोजित करण्यात आलेले आंदोलन हे केवळ एक राजकीय कार्यक्रम नसून विद्यार्थ्यांच्या भावना आणि संतापाचे प्रतीक म्हणून पाहिले पाहिजे.सर्वोच्च न्यायालयाच्या सरन्यायाधीशांनी एका सुनावणी दरम्यान तरुणांना कॉकरोच अशी उपमा दिल्याचा संदर्भ घेऊन अभिजीत दिपके यांनी सोशल मीडियावर विनोदी स्वरूपात कॉक्रोज जनता पार्टीची घोषणा केली. सुरुवातीला हा एक सोशल मीडिया प्रयोग वाटत असला, तरी अल्पावधीतच त्याला प्रचंड प्रतिसाद मिळाला. दोन कोटींहून अधिक लोकांनी या मोहिमेला पसंती दर्शवल्याचा दावा करण्यात आला. ही संख्या कितपत अचूक आहे यापेक्षा या उपक्रमामागील जनभावना अधिक महत्त्वाची आहे. समाज माध्यमांवर व्यक्त होणारा असंतोष अखेर प्रत्यक्ष आंदोलनाच्या स्वरूपात दिल्लीच्या रस्त्यांवर उतरला, हेच या घटनाक्रमाचे वैशिष्ट्य म्हणावे लागेल. जंतर-मंतर मैदानावरील आंदोलनाला किती लोक उपस्थित होते याबाबत वेगवेगळे दावे केले जात आहेत. आयोजक मैदान भरल्याचा दावा करतात, तर काही प्रसारमाध्यमे आणि सत्ताधारी पक्षाशी संबंधित घटक एक ते दीड हजार विद्यार्थी व पालक उपस्थित असल्याचे सांगतात. मात्र लोकशाहीत आंदोलनाचे महत्त्व हे केवळ उपस्थितीच्या आकड्यांवर ठरत नाही. महत्त्वाचे म्हणजे, विद्यार्थी आणि पालक स्वतःच्या प्रश्नांसाठी रस्त्यावर उतरले. परीक्षांमधील गैरव्यवहार आणि त्यातून होणाऱ्या अन्यायाविरोधात त्यांनी सार्वजनिकरित्या आवाज उठवला. ही बाबच शासन आणि प्रशासनासाठी गंभीर इशारा मानली पाहिजे. परीक्षा व्यवस्थेतील विश्वासार्हता हा कोणत्याही देशाच्या शैक्षणिक आणि सामाजिक विकासाचा पाया असतो. लाखो विद्यार्थी अनेक वर्षे परिश्रम करून परीक्षांची तयारी करतात. मात्र पेपरफुटी, गैरव्यवहार किंवा भ्रष्टाचाराच्या आरोपांमुळे त्यांच्या मेहनतीवर पाणी फिरते. अशा परिस्थितीत केवळ संबंधित अधिकाऱ्यांच्या बदल्या करणे किंवा किरकोळ कारवाई करणे पुरेसे ठरत नाही. जबाबदारीची साखळी वरपर्यंत पोहोचली पाहिजे आणि दोषींवर कठोर कारवाई झाली पाहिजे, अशी अपेक्षा विद्यार्थ्यांची आहे. त्यामुळे केंद्रीय शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान यांनी नैतिक जबाबदारी स्वीकारून राजीनामा द्यावा, अशी मागणी काही विद्यार्थी संघटना आणि आंदोलनकर्त्यांकडून केली जात आहे.दुसरीकडे, या आंदोलनावर विविध प्रकारचे राजकीय आरोप करण्यात आले. आंदोलनामागे विरोधक आहेत, आंदोलनकर्त्यांची निष्ठा संशयास्पद आहे किंवा हे केवळ राजकीय स्टंट आहे, अशा प्रतिक्रिया व्यक्त करण्यात आल्या. मात्र कोणत्याही आंदोलनाला बदनाम करण्यापेक्षा त्यामागील मूळ प्रश्न समजून घेणे अधिक आवश्यक असते. विद्यार्थ्यांचा रोष हा कोणत्याही एका पक्षाविरुद्ध नसून अन्यायकारक आणि अपारदर्शक व्यवस्थेविरुद्ध आहे. त्यामुळे आंदोलनकर्त्यांवर वैयक्तिक किंवा राजकीय आरोप करण्याऐवजी त्यांच्या मागण्यांवर चर्चा होणे आवश्यक आहे. अभिजीत दिपके यांनी एक दिवसीय आंदोलनानंतर देशव्यापी आंदोलनाची हाक दिली आहे. पुढील शनिवारपर्यंत शिक्षणमंत्र्यांचा राजीनामा न झाल्यास देशभर आंदोलन उभारले जाईल, असा इशाराही त्यांनी दिला आहे. ही घोषणा कितपत यशस्वी ठरेल हे भविष्यात स्पष्ट होईल. मात्र सध्याच्या घडीला या आंदोलनाने देशातील विद्यार्थ्यांच्या मनातील अस्वस्थता आणि व्यवस्थेवरील अविश्वास अधोरेखित केला आहे. लोकशाहीत आंदोलने ही केवळ विरोधाची साधने नसतात; ती सत्ताधाऱ्यांना वास्तवाचे भान देणारी माध्यमे असतात. कॉकरोच या उपहासात्मक शब्दातून सुरू झालेली ही चळवळ आता विद्यार्थ्यांच्या न्यायाच्या मागणीचे प्रतीक बनत आहे. सरकारने या आवाजाकडे दुर्लक्ष करण्याऐवजी परीक्षा व्यवस्थेत पारदर्शकता, उत्तरदायित्व आणि विश्वास निर्माण करण्यासाठी ठोस पावले उचलली, तरच या आंदोलनाचा खरा अर्थ आणि उद्देश साकार होईल.**

# आम्हीही टीईटी धारक आहोत?




**अंकुश शिंगाडे**
नागपूर

टीईटी परिक्षा. ही परिक्षा एवढी सक्तीची की ज्यातून शिक्षकांचे जीवही जावू शकतात. ही वास्तविकता आहे. कारण टीईटी परिक्षेत असे प्रश्न वचारले जातात, ज्याचे उत्तर शिक्षकांनाच येत नाहीत. ज्यात ते नापास होतात. तसं पाहिल्यास शिक्षकांना असलेल्या अनुभवांचं मुल्यांकनही टीईटी परिक्षा करु शकत नाही.शिक्षकांचे विद्यार्थ्यांच्या शिक्षणाच्या स्तरानुसार वेगवेगळे प्रकार पडलेले आहेत. ज्यातून प्राथमिक शिक्षक, माध्यमिक शिक्षक, उच्च माध्यमिक शिक्षक, प्राध्यापक असे प्रकार पडतात. यामध्ये प्राथमिक शिक्षक सोडले तर सर्व स्तरातील शिक्षकांना सुरक्षा प्रदान केलेल्या दिसतात. त्यांना शिकविण्या व्यतिरिक्त इतर कोणत्याही कामाला लावले जात नाही. जसे, प्राथमिक स्तरावरील लोकांना कामाला लावले जाते. तसं पाहिल्यास प्राथमिक शाळेतील शिक्षकांच्या पाहिजे त्या प्रमाणात संघटना सुद्धा सक्रिय नाहीत. जेवढ्या सक्रिय माध्यमिक विभागातील शिक्षकांच्या संघटना सक्रिय आहेत. ज्या सरकारच्या उटपटांग धोरणाला विरोध करतात. ज्यांना न्यायालयीन प्रक्रिया देखील छळत नाही. त्यातील एक प्रक्रिया म्हणजे टीईटी परिक्षा. ती माध्यमिक शाळेतील शिक्षकांना लागू नाही.

टीईटी परिक्षा. ती शिक्षकांनी द्यायची. अन् तेही ज्यांच्या सेवेची पाचपेक्षा जास्त वर्ष शिल्लक आहेत, त्यांनी द्यायची आहे. याचाच अर्थ असा की वय वर्ष त्रेपन्न असणारे सर्व शिक्षक हे शिकविण्यासाठी अपात्र आहेत.शिक्षक अपात्र. याचा अर्थ ते अध्यापनाचं कार्य करण्यास सक्षम नाहीत. याचाच अर्थ ते अपंग झाले आहेत. ते शारिरीक दृष्टीकोनातून सक्षम नाहीत. त्यांचा मेंदू चालत नाही. आता याबाबतीत काही लोकँ म्हणतात की शिक्षक जर शरीरानं अपंग झाले असतील तर त्याचं अपंगत्व तपासतांना मुख्यतः त्यांना डॉक्टरकडं पाठवावं लागेल. तरच ते शारिरीक दृष्टीकोनातून सक्षम आहे की नाही. हे ठरवता येईल. परंतु सध्या सुप्रीम कोर्टाच्या न्यायाधीशांनीच शिक्षकांना अपात्र ठरवलं. प्रत्यक्षात कारण विद्यार्थी हित घेतलं.

शिक्षक अपात्र. कारण त्यानं पात्रतेची परिक्षाच दिलेली नाही. खरंच शिक्षकांना पात्रतेच्या परिक्षेची गरज आहे काय? खरंच शिक्षक अपात्र असतात काय? याचा अर्थ नाही असाच येतो आणि ज्या शिक्षकांनी शिक्षकी पेशाचं प्रशिक्षण घेतलं. त्या शिक्षकांना टिईटी परिक्षा पास करण्याची गरज नाही. तरीही काही शिक्षकांनी दुय्यम सेवा मंडळाची परिक्षा दिली. अर्थात सन १९९७ पुर्वी दुय्यम सेवा निवड मंडळाच्या परिक्षा व्हायच्या. त्या बऱ्याच शिक्षकांनी दिलेल्या आहेत. त्या परिक्षा पास झालेल्या आहेत व त्याच परिक्षेत पास होवून सदर शिक्षक वर्ग नोकरीला लागलेले आहेत. ती पात्रतेचीच परिक्षा होती. असे असतांना आता नव्याने टीईटी परिक्षेची गरज काय? असं आजही शिक्षकांचंच मत आहे. तसंच दुसरं मत आहे सेवाशर्तीविषयक. शिक्षकांचं म्हणणं आहे की जेव्हा त्यांची नियुक्ती केली. तेव्हा सन १९८१ च्या नियमानुसार सेवाशर्ती नियम पाळूनच त्यांची नियुक्ती करण्यात आली होती. जर आज आम्ही अपात्र ठरलो असं न्यायालयाला वाटत असेल तर यात दोषी आम्ही नाहीच. दोषी आहेत ती तत्सम मंडळी. ज्यांनी आमची नियुक्ती केली. ज्यात मा. शिक्षणाधिकारी व मा. शाळा संस्थाचालक यांचा समावेश होतो. त्यामुळंच आधी त्यांच्यावर कारवाई करा. मगच इतर आमच्या सहकारी बांधवांवर कारवाई करा. असं शिक्षकांचं मत आहे. ज्यातून ते मत चुकीचं असं कोणीही म्हणू शकत नाही. टीईटी परिक्षा व त्या संदर्भात न्यायालयाची भुमिका. ज्यातून ती परिक्षा त्रेपन्न वर्ष ज्या कोणत्या शिक्षकांचे झालेले नाहीत. त्यांनी द्यावी. असं न्यायाधीश महोदयांचं म्हणणं आहे. अशावेळेस जे शिक्षक टीईटी परिक्षेत नापास झाले. त्यांना घरी बसवावं असं प्रावधान न्यायाधीश महोदयांनी नव्यानं निर्माण केलं आहे. जर असं झालंच आणि कोणी नापास झालंच व त्याला घरी बसवावे लागलेच तर त्याबद्दल शिक्षक म्हणतात की असं आम्हाला घरी बसवणं. ही न्यायाधीशाची कृती आमच्या जीविताची हानी करणारी कृती आहे. कारण आता आम्ही अशा पडावावर आहोत की ज्या पडावावर आम्हाला कोणतंही काम करणं जमत नाही. अशावेळेस आम्हाला न्यायाधीश महोदयांनी आपल्या निर्णयानुसार टीईटी परिक्षेच्या नापास माध्यमातून घरी बसवलं तर आम्ही या वयात कोणतेही कामधंदे करु शकणार नाही. परंतु कुटुंब आमच्या समोर असेल. त्यांच्या गरजा आमच्या समोर असेल. अशावेळेस इतर कामधंदे या वयात करता येत नसल्यानं आम्हाला चक्कं आत्महत्याच कराव्या लागतील. आता कोणी म्हणतात की शिक्षक टीईटी नापास झाला आणि त्याला शासनानं घरी जरी बसवलं तरी त्याला पेन्शन मिळेल. परंतु अलिकडील काळात शिक्षक बांधवांनी घर बांधायला पुरेसं कर्ज घेतलेलं असतं. त्यांच्या मुलांचं महाविद्यालयीन शिक्षण सुरु असतं. काहींच्या मुवींचे विवाह करायचे असतात. या सगळ्या गोष्टी केवळ पेन्शनच्या पैशानं पुर्ण होत नाहीत. ज्यासाठी पुर्ण वेतनाची गरज आहे. तेव्हा न्यायाधीश महोदयांनी टीईटी नापास धारकांना घरी बसवतांना असंही प्रावधान वा सोय न्यायालयीन निर्णयात करावी. जेणेकरुन उर्वरीत असलेल्या नोकरीचं उर्वीत संपुर्ण रक्कम त्याला लाभ म्हणून देता येईल. कारण कौटुंबिक जबाबदारी आहे. अन् न्यायालयीन आदेशानुसार शिक्षक हे टीईटी परिक्षा नापास होताच वेठबिगार ठरणार आहेत. विशेष सांगायचं झाल्यास सरकारला तसंही पाहता शाळेत शिकविण्यासाठी निवृत्त शिक्षकच लागतात. त्याबाबतीत निविदा देखील काढल्या जातात. अन् सरकार दरवर्षी निवृत्त शिक्षकांची करार पद्धतीनं नियुक्ती करु लागलेले आहेत. हे बरोबर जरी वाटत असलं तरी याबाबतीत सांगतांना आता शिक्षकांचे अनेक प्रश्न मिडीयावर झळकत आहेत. काहींचं म्हणणं आहे की सरकार ज्या निवृत्त कर्मचारी वर्गाला पुनः सेवेत करार पद्धतीनं नेमते. ते शिक्षक खरंच टीईटी टास तरी असतात काय? याचं उत्तर नाही असंच असतं. असे कर्मचारी टीईटी नसले तरी न्यायाधीशाला चालतात व आम्ही शिक्षण अर्हता पास असूनही आमच्यावर अपात्रतेचा ठपका ठेवतात.

महत्वपुर्ण बाब लक्षात घेण्यालायक ही आहे की अशा प्रकारच्या गोष्टी या प्राथमिक शिक्षकांच्याच पाठीमागे का? टीईटी शिक्षकांना आणि तेही प्राथमिक शाळेतील शिक्षकांनाच का? तसं पाहिल्यास जनगणना, बी एल ओ, कोरोनासारख्या संकट प्रसंगी तपासणी करणे असो, शौचालय बांधकाम असो, श्वान मोजणे असो, तसे देशातील कोणतेही काम असो, प्राथमिक शाळेतील शिक्षकांनाच कामाला लावलं जातं. आता न्यायाधीश महोदयांनीही टीईटी माध्यमातून प्राथमिक शाळेतील शिक्षकांनाच धारेवर धरलेले आहे. यातून असं दिसतंय की प्राथमिक शाळेतील शिक्षकांना जीवच नाही असं सरकारला वाटतं. तेच न्यायाधीशांनाही वाटतं नव्हे तर देशालाही तसंच वाटत असावं. कारण प्रत्येक बाबीत प्राथमिक शाळेतील शिक्षकच पिसला जातो. इतर विभागातील शिक्षक नाही. हे तेवढंच खरं.

# ४२ कोटी रु.खर्चाच्या रेणापुर सुधा प्रकल्पाची उंची वाढवण्याच्या कामाला लागला ब्रेक

## १.१० मीटरने वाढणार प्रकल्पाची उंची; ९.०५ द.ल.घ.मी होणार एकूण प्रकल्पातील पाणीसाठा

**बी.आर.पांचाळ**

भोकर-तालुक्यातील सर्वात मोठा प्रकल्प म्हणून रेनापुर सुधा प्रकल्पाची नोंद आहे, जुन्या प्रकल्पाची उंची कमी असल्याने पाणी साठवण क्षमता कमी होती सिंचन क्षेत्र देखील अत्यल्प होते. सिंचन क्षेत्र वाढावे पाणीसाठा देखील वाढावा म्हणून २०२२ साली प्रकल्पाची १.१० मीटरने उंची वाढवण्यास मंजुरी मिळाली. २०२५ मध्ये जवळपास ७० टक्के काम पूर्ण झाले मात्र भूसंपादन झालेल्या शेतकऱ्यांच्या शेतीचा ७० टक्के मावेजा न मिळाल्याने शेतकऱ्यांची आंदोलने झाली आणि प्रकल्पाच्या कामाला मात्र ब्रेक लागला.

अत्यल्प सिंचन क्षेत्र असलेला भोकर तालुका असून माळरान व खडकाळ जमिनीचा भाग आहे या भागातील शेतीचे सिंचन व्हावे या हेतूने तत्कालीन राज्यमंत्री डॉ. माधवराव किन्हाळकर यांनी विशेष प्रयत्न करून रेनापुर सुधा प्रकल्पाचे काम मंजूर करून घेतले आणि १९९५ ला प्रकल्प पूर्ण झाला मात्र म्हणावे तसे सिंचन क्षेत्र झाले नाही उंची कमी असल्याने साठवण क्षमता कमी झाली त्यामध्येच भोकर शहराची पाणीपुरवठा योजना तिथूनच झाल्याने पाणी आरक्षित ठेवण्यात येत होते. शेतीचे सिंचन होत नव्हते.

तालुक्यातील महत्त्वकांक्षी प्रकल्प म्हणून रेनापुर सुद्धा प्रकल्प असून या प्रकल्पाची उंची वाढवल्यास सिंचन क्षेत्र वाढते पाणीसाठा सुद्धा अधिक होऊ शकतो, ही बाब माजी मुख्यमंत्री खा.अशोकराव चव्हाण यांच्या निदर्शनास आल्याने त्यांनी प्रकल्पाची उंची वाढविण्याच्या कामासाठी मोलाचे प्रयत्न सुरू केले. पाणी उपलब्धता प्रमाणपत्र मिळत नव्हते. पाणी त्या ठिकाणी आहे हे सिद्ध झाल्यानंतर नाशिक येथून प्रमाणपत्र मिळाले आणि प्रकल्पाची उंची वाढविण्याच्या कामास खा.अशोकराव चव्हाण यांच्या प्रयत्नामुळे २०२२ मध्ये मंजुरी मिळाली. ४२ कोटी रुपये निधीचा हा प्रकल्प मंजूर झाला, या कामांमध्ये प्रकल्पाची उंची १.१० मीटरने वाढणार त्यासाठी ३७.७ हेक्टर जमिनीचे भूसंपादन करण्यात आले. ९.०५ द.ल. घ.मी पाणीसाठा होणार आहे. ८५० हेक्टर जमिनीचे सिंचन यामुळे होणार आहे.बोरगाव, किन्हाळा, सोमठाणा, थेरबन, बटाळा, रेनापुर या ६ गावातील शेतकऱ्यांची जमीन प्रकल्पात गेली.

**भूसंपादित जमिनीचा मावेजा न मिळाल्याने कामाला ब्रेक**

सदर प्रकल्प बाभळी बंधारा पाटबंधारे उपविभाग उमरी यांच्या अंतर्गत येत असून भूसंपादन व बांधकाम विष्णुपुरी प्रकल्प पाटबंधारे विभाग क्रमांक २ यांच्याकडे आहे. २०२५ मध्ये त्यांनी कामाला सुरुवात केली मात्र शेतीचा मावेजा न मिळाल्याने प्रकल्पग्रस्त शेतकऱ्यांनी ९ जून २०२६ रोजी उपोषण आंदोलन केले. त्यानंतर ७ कोटी ९२ लाख रु.मिळाले शेतकऱ्यांची नावे सातबारा वरून देखील कमी झाले. ७० टक्के रक्कम मिळावी म्हणून पुन्हा १८ मे २०२६ रोजी प्रकल्पग्रस्त शेतकऱ्यांनी उपविभागीय कार्यालयासमोर आमरण उपोषण केले. त्यावेळी ७०% मावेजा १५ कोटी ३७ लक्ष रुपये लवकरच देण्यात येईल, असे लेखी आश्वासन कार्यकारी अभियंता सी.आर. बनसोड विष्णुपुरी प्रकल्प विभाग क्र.२ यांनी १० जून २०२६ पर्यंत ७० टक्के मावेजा देणार असल्याचे आश्वासन दिल्याने शेतकऱ्यांनी उपोषण मागे घेतले. मात्र शेतीचा मावेजा मिळाल्याशिवाय प्रकल्पाचे काम होऊ देणार नाही, असा पवित्रा शेतकऱ्यांनी घेतल्याने कामाला मात्र ब्रेक लागला. २५% काम शिल्लक राहिले होते ते पावसाळ्यापूर्वी पूर्ण करण्याची तयारी संबंधित विभागाची होती मात्र शेतकऱ्यांच्या आंदोलनामुळे कामाला ब्रेक लागला.



**भोकरच्या पाणी पुरवठ्यासाठी झालेला सोलार प्रकल्प बंदच**

भोकर शहराच्या पाणीपुरवठ्यासाठी सुधा प्रकल्पामध्ये विहीर बांधून पाणीपुरवठा योजना करण्यात आली. विजेची अडचण आल्यास पाणीपुरवठ्यावर परिणाम होऊ नये म्हणून कोट्यावधी रुपयाचा सोलार प्रकल्प सुधा प्रकल्पाच्या बाजूला उभा करण्यात आला. मात्र तो प्रकल्प बंदच असल्याने त्यावर झालेला लाखोंचा खर्च मात्र वाया गेला आहे. तेथील मशिनरी धूळ खात पडल्या आहेत सोलार प्रकल्प उपयोगात आणायचा नव्हता तर सोलार प्रकल्प घेतला कशासाठी?, असा प्रश्न उपस्थित केला जात आहे.

**७ कोटीचा रस्ता राहिला अर्धवट:मुरूम टाकून केली दबाई**

सुधा प्रकल्पाला जाण्यासाठी रस्ता हवा म्हणून ७ कोटी रुपयाचा शिशी रस्ता मंजूर करण्यात आला. शिशी रोडचे काम प्रकल्पाच्या बाजूने थोडे बहुत सुरू करून बंद करण्यात आले. पुढील रस्ता मात्र मुरूम टाकून दबाई करण्यात आला, रस्ता अर्धवटच असल्याने आश्चर्य व्यक्त केल्या जात आहे. पावसाळ्यात रस्त्याचे मात्र हाल होणार आहेत. ७ कोटी रुपयाचा अर्धवट रस्ता का राहिला पूर्ण रस्ता का करण्यात आला नाही, याबाबत मात्र नागरिकातून प्रश्न उपस्थित केला जात आहे. शेतकऱ्यांनी मागणी केलेला रस्ता करण्यात आला नाही. आणि हा अर्धवट रस्ता मात्र तात्काळ करण्यात आला, याबाबत आश्चर्य व्यक्त केल्या जात आहे.

# राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या जिल्हा सचिवपदी विनोद आडे

मांडवी/प्रतिनिधी-राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे (अजित पवार गट) जिल्हाध्यक्ष बाळासाहेब पाटील रावणगावकर यांनी पक्षाच्या संघटनात्मक रचनेत मोठा फेरबदल करत, किनवट तालुक्यातील कोठारी येथील खंबीर कार्यकर्ते श्री. विनोद उद्धव आडे यांची नांदेड राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीच्या (उत्तर) विभागाच्या फ्रन्टल सेलच्या जिल्हासचिव पदी अधिकृत नियुक्ती केली आहे.

पक्षाचे जिल्हाध्यक्ष बाळासाहेब पाटील रावणगावकर यांच्या स्वाक्षरीने त्यांना नुकतेच नियुक्ती पत्र प्रदान करण्यात आले. विनोद आडे यांनी नांदेड जिल्हा आणि विशेषतः किनवट भागात राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीच्या वाढीसाठी आणि पक्ष संघटना मजबूत करण्यासाठी केलेल्या उल्लेखनीय कार्याची दखल घेऊन पक्षाने त्यांच्यावर ही मोठी जबाबदारी सोपवली आहे. पक्षाच्या राष्ट्रीय अध्यक्षा तथा उपमुख्यमंत्री श्रीमती सुनेत्राताई अजितदादा पवार, प्रदेशाध्यक्ष खा. सुनील तटकरे आणि आ. प्रतापराव पाटील



चिखलीकर यांच्या खंबीर नेतृत्वाखाली व सचिन नाईक यांच्या मार्गदर्शनात जिल्ह्यात पक्षाचे कार्य वेगाने सुरू आहे. पक्षाने माझ्यावर दाखवलेला विश्वास मी सार्थ ठरवेन. स्वर्गीय अजितदादा पवार यांचे विचार आणि पक्षाची ध्येयधोरणे जिल्ह्यातील घराघरांत पोहोचवण्यासाठी मी कटिबद्ध राहीन, अशी प्रतिक्रिया नवनियुक्त जिल्हासचिव विनोद आडे यांनी नियुक्तीनंतर दिली. आडे याच्या नियुक्तीमुळे किनवट आणि नांदेड उत्तर भागात राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाला अधिक बळ मिळणार असल्याचा विश्वास व्यक्त होत आहे. यावेळी सचिन नाईक, सुरेश रंगेणवार, रामरेड्डी आईटवार, माणिकराव पाटील माहूर, विजय राठोड, दिलीप राठोड,सुरेश राठोड उपस्थित होते.

सायंदैनिक नांदेड वार्ता
* संपर्क कार्यालय *
व्ही.डी.देशपांडे भवन, सोमेश कम्पाऊंड, मिलगेट जवळ, नांदेड-१
**मुख्यसंपादक**-प्रदीप नागापूरकर, भ्रमणध्वनी ९४२२१७४७७४,
**सहसंपादक**-अविनाश पाटील, भ्रमणध्वनी ९४२१९९०८८८
E-mail: nandedwarta@mail.com

# माहूरमध्ये अनधिकृत बांधकामांकडे नगर पंचायतीचा कानाडोळा?

## विना परवाना आणि नियम बाह्य अनधिकृत बांधकामांचे पेव

माहूर/प्रतिनिधी-शहरात नियम धाब्यावर बसवून सुरू असलेल्या अनधिकृत बांधकामांची संख्या दिवसे दिवस वाढतच आहे.शहरात उभारल्या जात असलेल्या बहुमजली इमारतीचा काहीं विना परवाना तर काही बांधकाम परवान्याच्या अटी पायदळी तुडवून पूर्णत्वाकडे पोहोचला असतानाही नगर पंचायत प्रशासनाने अद्याप कोणतीही ठोस कारवाई न केल्याने संशय व्यक्त केला जात आहे.

मागील वर्षे भरा पासून माहूर शहरात विना परवाना व नियमबाह्य बांधकामांचे प्रमाण झपाट्याने वाढले असून नगर पंचायत प्रशासन मात्र बघ्याची भूमिका घेत असल्याचा आरोप नागरिकांतून होत आहे. भूखंडांचे श्रीखंड करणाऱ्या भू-माफियांना प्रशासनाच्या निष्क्रियतेमुळे चांगलेच फावल्याची चर्चा शहरात रंगली आहे.शासनाच्या निर्देशांना पायदळी तुडवत आणि नगर पंचायतीने दिलेल्या बांधकाम परवान्यांतील अटींना केराची टोपली दाखवत गेल्या एक दोन वर्षांत शहरात मोठ्या प्रमाणात अवैध बांधकामे उभी राहिली आहेत. विशेष म्हणजे यासंदर्भात नगर पंचायती कडे या पूर्वी नागरिकांनी तक्रारी केल्या होत्या तर नगर पंचायतिच्या एका मासिक सभेत हा विषय नगर सेवकानी लावून धरला होता.त्यावेळी संबंधितांना नोटिसा बजावण्यात आल्या; व सोपासकर पूर्ण करण्यात आले मात्र त्यानंतर पुढील कारवाईचा मागमूसही दिसून आला नाही.

राष्ट्रीय महामार्गालगत निवासी बांधकामासाठी ९० फूट आणि व्यावसायिक बांधकामासाठी १२० फूट अंतर सोडणे बंधनकारक असताना अनेक ठिकाणी केवळ ५० फूट अंतरावर व्यावसायिक गाळे, हॉटेल्स आणि इतर बांधकामे उभारली जात आहेत. काही ठिकाणी तर कोणतीही परवानगी न घेता सर्रास बांधकामे सुरू असल्याचा आरोप होत आहे.शहरात टोलेजंग इमारतींची बांधकामे सुरू असताना संबंधित अधिकारी नेमके काय करीत आहेत, असा प्रश्न नागरिक विचारत आहेत. मोठं मोठी बांधकामे पूर्ण होत असताना प्रशासनाला बांधकाम दिसले नाही का? नोटिसा दिल्या असतील तर पुढील कारवाई का झाली नाही? आणि कारवाई झाली नसेल तर त्याला जबाबदार कोण? असे अनेक प्रश्न उपस्थित होत आहेत.

### शासन निर्णय काय सांगतो?

नगर विकास विभागाने महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम, १९६६ अंतर्गत अनधिकृत बांधकामांवर कारवाई करण्यासाठी स्पष्ट कार्यपद्धती निश्चित केली आहे.महाराष्ट्र नगरपालिका अधिनियमातील कलम २६०, २६७, २६७-अ तसेच एमआरटीपी कायद्यातील कलम ५२, ५३ व ५४ नुसार अनधिकृत बांधकामांवर नोटीस, दंडात्मक कारवाई आणि आवश्यक असल्यास पाडकामाची तरतूद आहे.शासनाच्या ३ मे २०१८ च्या परिपत्रकानुसार तसेच २ मार्च २००९ च्या शासन निर्णयानुसार संबंधित अधिकाऱ्यांच्या कार्यक्षेत्रात अनधिकृत बांधकामे आढळल्यास संबंधित अधिकाऱ्यांवरही जबाबदारी निश्चित करून कारवाई करण्याचे निर्देश आहेत.

### नागरिकांची तक्रार;कारवाईची मागणी

याच पार्श्वभूमीवर सामाजिक कार्यकर्ते विनोद सूर्यवंशी यांनी मुख्याधिकारी, नगर पंचायत माहूर यांच्याकडे लेखी तक्रार सादर करून शहरातील सर्व अनधिकृत व अनियमित बांधकामांची चौकशी करण्याची मागणी केली आहे. यासोबतच पूर्वी नोटिसा बजावलेल्या बांधकाम धारकांवर अंतिम कारवाई करून नियमबाह्य बांधकामांवर हातोडा चालविण्याची मागणीही करण्यात आली आहे.आता नगर पंचायत प्रशासन या तक्रारीची कितपत गंभीर दखल घेते आणि शहरातील अनधिकृत बांधकामांवर प्रत्यक्ष कारवाई करते की पुन्हा एकदा नोटिसांच्या फाईलपुरतेच प्रकरण मर्यादित राहते, याकडे माहूरकरांचे लक्ष लागले आहे.

# बळीराम पाटील रुग्णालयात आरोग्य सेवेचा बोजवारा

मांडवी/प्रतिनिधी-येथील बळीराम पाटील रुग्णालयात सध्या आरोग्य सेवेचा बोजवारा उडाला असून, तब्बल तीन मंजूर पदांपैकी केवळ एकाच डॉक्टरावर संपूर्ण रुग्णालयाचा भार पडला आहे. यामुळे ग्रामीण भागातील गोरगरीब रुग्णांना वेळेवर उपचार मिळत नसून, त्यांना नाईलाजाने खाजगी रुग्णालयांची पायपीट करावी लागत आहे. या गंभीर परिस्थितीची दखल घेत माजी जिल्हा परिषद सदस्य प्रफुल राठोड यांनी रुग्णालयाला प्रत्यक्ष भेट देऊन पाहणी केली, तसेच तात्काळ डॉक्टर उपलब्ध न झाल्यास तीव्र आंदोलनाचा इशारा दिला आहे.

मांडवी येथील या महत्त्वाच्या रुग्णालयात डॉक्टरांची एकूण तीन पदे मंजूर आहेत. मात्र, सद्यस्थितीत यातील एक डॉक्टर प्रतिनियुक्तीवर कार्यरत आहेत, तर दुसरे डॉक्टर रजेवर आहेत. त्यामुळे सध्या वैद्यकीय अधीक्षक डॉ. विक्रम राठोड यांच्या एकट्या वरच संपूर्ण रुग्णालयाचा डोलारा सांभाळण्याची वेळ आली आहे. डॉ. राठोड यांना दररोज बाह्य रुग्ण विभाग आणि अंतर रुग्ण विभाग सांभाळणे., आपत्कालीन केसेस आणि शवविच्छेदन करणे., प्रशासकीय बैठका आणि शासकीय कामकाजाचा निपटारा करणे यासह अन्य कामांचा ताण सहन करावा लागत आहे. एकाच वेळी एवढ्या जबाबदाऱ्या सांभाळताना डॉक्टरांची मोठी ओढाताण होत असून, याचा थेट फटका रुग्णांना बसत आहे. डॉक्टर वेळेवर उपलब्ध होऊ शकत नसल्याने रुग्णांना आरोग्य सेवेपासून वंचित राहावे लागत आहे. दि.७ जून रोजी माजी जिल्हा परिषद सदस्य प्रफुल राठोड यांनी बळीराम पाटील रुग्णालयाला अचानक भेट दिली. यावेळी डॉक्टर उपलब्ध नव्हते तसेच रुग्णालयातील दुरवस्था आणि रुग्णांचे हाल पाहून त्यांनी तीव्र नाराजी व्यक्त केली. ग्रामीण भागातील जनतेला आरोग्य सुविधा मिळणे हा त्यांचा हक्क असताना, प्रशासनाच्या दिरंगाईमुळे नागरिकांना आर्थिक भुर्दंड सहन करून खाजगी दवाखाने गाठावे लागत असल्याबद्दल त्यांनी संताप व्यक्त केला. ग्रामीण भागातील जनतेच्या आरोग्याशी खेळ खपवून घेतला जाणार नाही. मांडवी येथील रुग्णालयात तातडीने दोन डॉक्टरांची नियुक्ती करून आरोग्य सेवा सुरळीत न केल्यास, प्रशासनाविरुद्ध तीव्र आंदोलन छेडण्यात येईल, असा इशारा प्रफुल राठोड यांनी दिला.तसेच या दवाखान्यासाठी आमच्या पूर्वजांनी गोरगरीब जनतेला आरोग्य सेवा मिळावी यासाठी जमीन दान दिली. जर रुग्णांना आरोग्य सेवा मिळत नसेल तर आमची जमीन आम्हाला परत द्या अशी मागणी माजी जि. प. सदस्य प्रफुल राठोड यांनी केली.

# नायगाव-नरसी परिसरात भेसळयुक्त अन्न पदार्थ विक्री?

नायगाव/प्रतिनिधी-नायगाव तालुक्यासह नरसी परिसरात भेसळयुक्त पनीर, दूध व खाद्यतेल विक्री होत असल्याची चर्चा नागरिकांमध्ये सुरू असून यामुळे ग्राहकांमध्ये नाराजीचे वातावरण निर्माण झाले आहे. संबंधित यंत्रणांनी याकडे गांभीर्याने लक्ष देऊन तपासणी मोहीम राबवावी, अशी मागणी होत आहे.

स्थानिक नागरिकांच्या म्हणण्यानुसार, काही ठिकाणी विक्रीसाठी उपलब्ध असलेल्या पनीरच्या गुणवत्तेबाबत शंका व्यक्त केली जात आहे. तसेच पॅकेटबंद दूध उघडून त्यामध्ये पाणी किंवा इतर पदार्थ मिसळून विक्री केली जात असल्याची चर्चा आहे. याशिवाय खाद्यतेलामध्येही भेसळ होत असल्याच्या तक्रारी नागरिकांकडून केल्या जात आहेत. न्नपदार्थांमधील संभाव्य भेसळीमुळे ग्राहकांच्या आरोग्यावर परिणाम होण्याची भीती व्यक्त केली जात असून नायगाव व नरसी येथील बाजारपेठांमध्ये अन्न व औषध प्रशासन विभागाने अचानक तपासण्या करून दूध, पनीर व खाद्यतेलाचे नमुने तपासणीसाठी पाठवावेत, अशी मागणी ग्राहकांकडून होत आहे. नागरिकांच्या आरोग्याशी संबंधित हा संवेदनशील विषय असल्याने संबंधित विभागाने त्वरित कारवाई करून वस्तुस्थिती समोर आणावी व नियमांचे उल्लंघन करणाऱ्यांवर कठोर कारवाई करावी, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे.

# धनज येथे घरकुल लाभार्थ्यांसाठी मोफत रेती वाटपाला सुरुवात



नायगाव/प्रतिनिधी-मौजे धनज येथे प्रधानमंत्री आवास व इतर घरकुल योजनांतील पात्र लाभार्थ्यांना मोफत रेती उपलब्ध करून देण्याच्या उपक्रमाला आज सुरुवात करण्यात आली. या उपक्रमामुळे घरकुल बांधकाम करणाऱ्या लाभार्थ्यांना मोठा दिलासा मिळणार असल्याची भावना व्यक्त करण्यात येत आहे.

रेती वाटप प्रक्रियेची पाहणी करण्यासाठी उपविभागीय अधिकारी डोंबे मॅडम, तहसीलदार धमपिर्या गायकवाड मॅडम, मंडळ अधिकारी, ग्राम महसूल अधिकारी यांनी भेट दिली. तसेच कुंटूर पोलीस ठाण्याचे एपीआय घोडके साहेब,व पोलीस कर्मच्यारी उपस्थित राहून व प्रक्रियेची पाहणी केली.यावेळी गावचे सरपंच, पोलीस पाटील तसेच ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. पात्र लाभार्थ्यांना नियमानुसार व पारदर्शक पद्धतीने रेतीचे वाटप करण्यात येत असल्याची माहिती संबंधित अधिकाऱ्यांनी दिली. घरकुल योजनांच्या लाभार्थ्यांना बांधकामासाठी आवश्यक रेती उपलब्ध करून देण्याच्या या उपक्रमाचे नागरिकांकडून स्वागत करण्यात येत असून यामुळे घरकुलांची कामे गतीने पूर्ण होण्यास मदत होणार आहे.

# स्थानिक निवडणुकांपूर्वी राष्ट्रवादीची संघटन बांधणी;श्याम केंद्रेंना जिल्हा सरचिटणीसपदाची जबाबदारी



किनवट/प्रतिनिधी-काही महिन्यांवर येऊन ठेपलेल्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या सार्वत्रिक निवडणुका लक्षात घेता राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीच्या राष्ट्रीय अध्यक्षांनी पक्षसंघटन मजबूत करण्याच्या दृष्टीने नव्याने पदाधिकाऱ्यांचे संगठण चालू केले आहे. राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीच्या नांदेड (उत्तर) जिल्हा सरचिटणीसपदी श्याम केंद्रे पाटील पार्डीकर यांची नियुक्ती करण्यात आली आहे. रा. काँ.पा.चे जिल्हाध्यक्ष बाळासाहेब पाटील रावणगावकर आणि प्रतापराव पाटील चिखलीकरांच्या हस्ते आणि मान्यवरांच्या उपस्थितीत नियुक्तीपत्र प्रदान केले आहे. केंद्रे यांच्याकडे संघटन कौशल्य असल्यामुळे रा.का.पा.चे पक्षसंघटन मजबूत करण्याला वाव मिळणार आहे.

किनवट विधानसभा मतदारसंघावर श्याम केंद्रे यांची राजकीय व सामाजिक कार्याची पक्कड मजबूत आहे. सचिन नाईक मित्रमंडळात त्यांची उल्लेखनीय कामगिरी होती. सचिन नाईकांचा हात धरुन जनमानसात त्यांचा परिचय करून देण्याचे काम केंद्रेंनी केले होते. गोकुंदा, बोधडी, जलधरा जिल्हा परिषद गटातून मागच्या सर्वच निवडणुकीत नाईक मित्रमंडळाला सर्वाधिक मते मिळवून देण्यासाठी त्यांचा महत्त्वाचा वाटा होता. मागच्या विधानसभा निवडणुकीच्या प्रचार प्रयोजनात केंद्रेंचा अत्यंत महत्वाचा रोल होता. म्हणून पक्षश्रेष्ठींनी त्यांच्यावर जिल्हा सरचिटणीस पदाची जबाबदारी सोपवलीय.रा.काँ.पा.च्या राष्ट्रीय अध्यक्षा श्रीमती सुनेत्रा पवार, प्रांतध्यक्ष सुनिल तटकरेंच्या सल्लूयानुसार प्रतापराव पाटील चिखलीकर आणि जिल्हाध्यक्ष बाळासाहेब पाटील रावणगावकरांनी ६ जून २०२६ रोजी नांदेड येथे एका छोटेखानी कार्यक्रमात नियुक्तीपत्र प्रदान केल्याचे सांगण्यात आले. केंद्रेंचा रा. काँ. पा.त प्रवेश म्हणजे पक्षाने बरोबर हेरुन जबाबदारी सोपवलीय. बोधडी जि.प. गटावर रा.काँ.पा.चे मागील वीस वर्षांपासून वर्चस्व होते. अलीकडे त्या ठिकाणी भाजपाने पाय पसरल्याने रा. काँ. पा. विचाराच्या कार्यकर्ते हवालदिल झाले होते. परंतु केंद्रेंच्या प्रवेशाने सुटकेचा निःश्वास टाकल्याचे ऐकायला मिळते.

# आंतरराष्ट्रीय मराठी साहित्य संमेलनाध्यक्षपदी देवीदास फुलारी

## मॉरिशसमध्ये नांदेडचा साहित्यिक गौरव



नांदेड/प्रतिनिधी-मॉरिशस येथे आयोजित करण्यात आलेल्या सातव्या आंतरराष्ट्रीय मराठी साहित्य संमेलनाच्या अध्यक्षपदी नांदेडचे ज्येष्ठ साहित्यिक देवीदास फुलारी यांची निवड करण्यात आली आहे. महात्मा गांधी इन्स्टिट्यूट, मॉरिशस आणि स्नेहल आर्ट्स अँड एज्युकेशन सोसायटी, डोंबिवली यांच्या संयुक्त विद्यमाने हे संमेलन आयोजित करण्यात आले असून, या निवडीमुळे नांदेडच्या साहित्यविश्वात आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे.

संमेलनाच्या आयोजक प्रा. कल्पना गवरे यांनी ही माहिती दिली. मॉरिशस येथील महात्मा गांधी इन्स्टिट्यूटच्या सभागृहात गुरूवार, २५ जून रोजी हे भव्य साहित्य संमेलन पार पडणार आहे.या संमेलनात ग्रंथदिंडी, उद्घाटन सोहळा, विविध विषयांवरील परिसंवाद, चर्चासत्रे, गझल मुशायरा, कवी संमेलन, पुस्तक प्रकाशन आदी भरगच्च कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. मराठी भाषा, साहित्य आणि संस्कृतीचा जागतिक स्तरावर प्रचार-प्रसार करण्याच्या दृष्टीने हे संमेलन महत्त्वपूर्ण ठरणार असल्याचे आयोजकांनी सांगितले. मॉरिशसमधील मराठी भाषिक विद्यार्थी, शिक्षक, साहित्य अभ्यासक तसेच रसिकांची मोठ्या संख्येने उपस्थिती राहणार असल्याची माहिती नियोजन समितीचे अध्यक्ष रवींद्र सोनवणे यांनी दिली. साहित्य क्षेत्रातील उल्लेखनीय योगदानाची दखल घेत देवीदास फुलारी यांच्यावर संमेलनाध्यक्षपदाची जबाबदारी सोपविण्यात आल्याने नांदेडच्या साहित्यिक वर्तुळातून त्यांचे अभिनंदन होत आहे.या निवडीमुळे नांदेडच्या साहित्य परंपरेला आंतरराष्ट्रीय स्तरावर नवी ओळख मिळाली असून, मराठी साहित्याच्या जागतिक प्रसारासाठी हा सन्मान महत्त्वाचा मानला जात आहे.

# उत्सव मेला मधून दोन महिलांचे मंगळसूत्र लंपास

नांदेड/प्रतिनिधी-शहरातील हिंगोली गेट मैदानावर लावण्यात आलेल्या उत्सव मेला बघण्यासाठी गेलेल्या दोन महिलांचे मंगळसूत्र अज्ञात चोरट्यांनी चोरी केल्याची घटना शनिवारी रात्री घडली आहे.

हिंगोली गेट मैदानावर उत्सव मेला लावण्यात आला आहे. शनिवार व रविवार दोन दिवस सुट्टी असल्याने उत्सव मेला बघण्यासाठी सायंकाळी नागरिकांनी गर्दी केली होती. प्रतिष सुरेश राठोड रा.चैतन्यनगर,नांदेड यांची पत्नी व एक महिला दोघीजणी शनिवारी रात्री उत्सवमेला बघण्यासाठी गेल्या होत्या. गर्दीचा फायदा घेत अज्ञात चोरट्यांनी दोन्ही महिलांच्या गळ्यातील सोन्याचे मंगळसूत्र चोरुन नेले आहे. या प्रकरणी वजिराबाद पोलीस ठाण्यात अज्ञात चोरट्या विरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

जा.क्र.नांवाशमनपा/क्षे.का.०१/नापवि/५२०/२०२६
नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका, नांदेड.
दिनांक : ०३-६-२०२६

**जाहीर प्रगटन**

**संचिका क्रं.NT/०१/१३६८६ क्षे.का.क्र.१ तरोडा-सांगवी**
**प्रकरण : नांव परिवर्तन करणे बाबत.**

या जाहीर प्रगटनाच्या आधारे सर्व जनतेस कळविण्यात येते की **आरती विनोदकुमार चरखा** रा.**तरोडा खु.नांदेड** या कार्यालयात अर्ज सादर केला आहे की, ता.नि.भु.अ.पत्र क्र.**१०५१/०९ दि.३०/१०/२००९ गट नं.११६ प्लॉट नं.०६ चा प. भाग पिन क्र.४०१०३०७४८९३** श्री.१.**गोदावरी लक्ष्मण जिंदे, २.दिप्ती सुरज मवाडे, ३.निशा लक्ष्मण जिंदे, ४.रिना लक्ष्मण जिंदे** यांच्या नावे असलेली मालमत्ता यांचेकडुन अर्ज **खरेदीखत क्र.१८३० दि.१६/०२/२०२६** च्या आधारे विकत घेतली आहे./ वारसा हक्क प्राप्त झालेली आहे. तरी त्यांचे नांवे कर आकारणी नोंद वहीत घेण्यासाठी जाहिर प्रगटन देण्यात येत आहे.

तरी या संबंधात कोणास काही आक्षेप असल्यास त्यांनी हे पत्रक प्रसिद्ध झाल्याच्या तारखेपासून (१५) दिवसाच्या आत या कार्यालयात आपला लेखी आक्षेप पुराव्यासहीत दाखल करावा. अन्यथा अवधी संपल्यानंतर अर्जदाराच्या नांवे वरील प्रमाणे मालमत्ता नोंदविण्यात येईल.

**चर्तुःसिमाः- पुर्व**- मोकळी जागा व कंपाऊड वाल आहे, **पश्चिम**-मोकळी जागा व कंपाऊड वाल आहे, **दक्षिण**-फ्लॉट नं.०१ पार्कींग आहे, **उत्तर**-मोकळी जागा व कंपाऊड वाल आहे.

स्वाक्षरित/-
**सहाय्यक आयुक्त**
क्षे.का.क्रं.०१ तरोडा सांगवी,
नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका, नांदेड

CHANGE IN NAME

My (old name) is **MATALKAR SHESHEKANT GOPALRAO** which now I am, changing as (new name) **SHASHIKANT GOPALRAO MATALKAR**
Hence, forth my all correspondance will be done as per my new name. please consider the same.
Sign by
**SHASHIKANT GOPALRAO MATALKAR**
R/o waard no. 4, At Post Niwgha Bazar
Nanded-431712
M.No.-8237763633

CHANGE IN NAME

My (old name) is **BAHETI SANJAYKUMAR** which now I am, changing as (new name) **SANJAY KACHRULAL BAHETI**
Hence, forth my all correspondance will be done as per my new name. please consider the same.
Sign by
**SANJAY KACHRULAL BAHETI**
R/o H.no. 2-12-443, near pratibha niketan college bandha ghat road Nanded-431601
M.No.-9422172350

CHANGE IN NAME

My (old name) is **KAVITA BAHETI** which now I am, changing as (new name) **INDIRA SANJAY BAHETI**
Hence, forth my all correspondance will be done as per my new name. please consider the same.
Sign by
**INDIRA SANJAY BAHETI**
R/o H.no. 2-12-443, near pratibha niketan college bandha ghat road Nanded-431601
M.No.-9422172350

CHANGE IN NAME

My (old name) is **CHOUSE SHANAZ SULTANA** which now I am, changing as (new name) **SHAHNAZ BEGUM HABIB BIN AZAN**
Hence, forth my all correspondance will be done as per my new name. please consider the same.
Address
5-1-251,Arab Galli Qilla Road Nanded-431604
M No-9422188919

CHANGE IN NAME

My (old name) is **MOHAMMED ABDUL HABIB** which now I am, changing as (new name) **HABIB BIN AZAN BIN ABDULLAH**
Hence, forth my all correspondance will be done as per my new name. please consider the same.
Address
5-1-251,Arab Galli Qilla Road Nanded-431604
M No-9422188919

# डांबर नाही, मग निविदा कशासाठी?, गोकुंद्यात महामार्ग प्राधिकरणावर सवाल

किनवट/प्रतिनिधी- सरसम ते धनोडा राष्ट्रीय महामार्ग १६१ (अ) वरील गोकुंदा शहरातील एक कि.मि.रस्त्यांच्या डांबरीकरणाचे काम पुन्हा धूळखात पडले आहे. महामार्ग प्राधिकरणाने कागदी घोडे नाचवून 'रिस्क अँड कॉस्ट' तत्त्वावर ९२ लाख ७९ हजार ५२५ रुपयांच्या अंदाजपत्रकाचे काम ज्या कंत्राटदाराने सर्वांचाच विश्वास गमावला होता त्याच कंत्राटदाराला दिल्याने पुन्हा गोकुंद्रावाशियांना अपघाताचे फटके सहन करावे लागताहेत. रस्त्यावर घाईघाईने गिट्टी पसरवण्यात आली, मात्र आता मार्केटमध्ये डांबरच उपलब्ध नसल्याची संबंधितांनी कबुली दिल्याने पावसाळ्यापूर्वी डांबरीकरण होईल अशी आशा मावळताना दिसते.

उड्डाण पुलाच्या नावाखाली वर्षानुवर्षे जनतेला धुळीचे आणि चिखलाचे साम्राज्य देणाऱ्या कंत्राटदाराला आता डांबराचा तुटवडा भासू लागला आहे. जर डांबर नव्हते, तर प्रशासनाने निविदा कोणत्या आधारावर काढली आणि कंत्राटदाराने कामाचा विडा का उचलला? असा रोखठोक सवाल आता त्रस्त नागरिक विचारत आहेत. पावसाळ्याचे दिवस अगदी तोंडावर आले आहेत. एकदा का पाऊस सुरू झाला की तांत्रिक कारणास्तव डांबरीकरण करता येत नाही, हीच नामी संधी साधून कंत्राटदार पावसाळ्याचे निमित्त पुढे करून पुन्हा कामातून पळ काढण्याच्या तयारीत आहे, हे स्पष्ट दिसत आहे.



रस्त्यावर पसरलेली ही उघडी खडी आता दुचाकी वाहनधारकांसाठी जीवघेणी ठरत आहे. ब्रेक लावला की गाडी घसरून रोज लहान-मोठे अपघात होत आहेत. आधी खड्ड्यांचा छळ होता, आता या घसरत्या खडीमुळे लोकांचे हातपाय मोडत आहेत. पावसाळ्यात या खडीमध्ये पाणी साचून तिचे चिखलात रूपांतर होणार आणि गोकुंद्रावासीयांना पुन्हा एकदा नरकयातना भोगाव्या लागणार, हे आता सूर्यप्रकाशा इतके स्वच्छ आहे.शारदा कन्स्ट्रक्शन कंपनीच्या हलगर्जीपणामुळे गोकुंदा आधीच होरपळला आहे. अशा बेजबाबदार कंत्राटदारावर फौजदारी गुन्हे दाखल करून त्याला तात्काळ काळ्या यादीत टाकणे गरजेचे होते. परंतु, राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाचे अधिकारी आणि कंत्राटदार यांच्यातील 'अर्थपूर्ण' संबंधांमुळेच जनतेला वेठीस धरले जात असल्याचा आरोप आता उघडपणे होऊ लागला आहे.

> प्रशासनाने उपोषणकर्ते मारोतीराव सुंकलवाड आणि गोकुंद्याच्या जनतेला लेखी आश्वासन देऊन केवळ वेळ मारून नेली आहे. कंत्राटदाराची ही डांबर-नाट्यगिरी सहन केली जाणार नाही. जर पावसाळ्यापूर्वी डांबरीकरणाचे काम पूर्ण झाले नाही, तर होणाऱ्या तीव्र जनआंदोलनाला आणि कायदा-सुव्यवस्थेच्या परिस्थितीला केवळ महामार्ग प्रशासन आणि हा कंत्राटदारच जबाबदार असेल.
>
> **-संतप्त गोकुंदावासीय व सामाजिक संघटना**

## कर्कश आवाज करणाऱ्या बुलेट वाहनांवर कारवाई

देगलूर/प्रतिनिधी-देगलूर शहरात काही युवकांकडून बुलेट मोटारसायकलींमध्ये अनधिकृत बदल (मॉडीफिकेशन) करून कर्कश आवाज करणारे सायलेन्सर बसवून वाहन चालविले जात असल्याचे निदर्शनास आले आहे. अशा वाहनांमुळे ध्वनी प्रदूषण निर्माण होऊन नागरिकांना त्रास होत असून सार्वजनिक शांतता व सुव्यवस्थेवर परिणाम होत आहे.याची गंभीर दखल घेऊन देगलूर पोलीस स्टेशनतर्फे विशेष मोहीम राबविण्यात येत असून कर्कश आवाज करणारे सायलेन्सर बसविलेल्या बुलेट वाहनांवर कारवाई सुरू करण्यात आली आहे.

# महावितरणच्या गलथान कारभाराच्या निषेधार्थ नागरिकांचा मोर्चा

धर्माबाद/प्रतिनिधी-धर्माबाद शहरात गेल्या अनेक दिवसांपासून सुरू असलेल्या वारंवारच्या वीज खंडिततेमुळे नागरिकांचा संयम अखेर संपला असून संतप्त नागरिकांनी आज (सोमवार) महावितरण कार्यालयावर मोर्चा काढून अधिकाऱ्यांना जाब विचारला आहे.

महावितरणकडून निसर्ग चक्रीवादळ आणि पावसामुळे तांत्रिक अडचणी निर्माण झाल्याचे कारण देण्यात येत असले तरी मागील आठ ते दहा दिवसांपासून शहरात वीजपुरवठा सुरळीत होत नसल्याची तक्रार नागरिकांनी केली. वारंवार वीज खंडित होत असल्याने नागरिकांनी संबंधित अधिकाऱ्यांशी दूरध्वनीद्वारे संपर्क साधण्याचा प्रयत्न केला; मात्र नेहमीप्रमाणे कोणताही प्रतिसाद मिळाला नसल्याचा आरोप करण्यात आला. संतप्त नागरिकांनी निवेदन देऊन अधिकाऱ्यांना जाब विचारला असता, आमच्याकडून काही त्रुटी झाल्याची कबुली अधिकाऱ्यांनी दिल्याचे नागरिकांनी सांगितले. धर्माबाद परिसरात केबल फॉल्ट, ट्रान्सफॉर्मरला आग लागणे, स्पार्किंग होणे, ट्रान्सफॉर्मरमधून स्फोटासारखे आवाज येणे, वीजतारा तुटणे, खांबे कोसळणे आणि झाडांच्या फांद्या वीजवाहिन्यांवर पडणे अशा समस्यांमुळे वारंवार वीजपुरवठा खंडित होत असल्याचे निदर्शनास आणून देण्यात आले. भरमसाठ वीज बिले भरूनही रोज वीज खंडित होत असेल तर आमचे पैसे झाडाला लागले आहेत का? असा संतप्त सवाल नागरिकांनी उपस्थित केला. वीजपुरवठा खंडित राहिल्यामुळे शहराच्या पाणीपुरवठ्यावरही गंभीर परिणाम झाला आहे. गेल्या पाच दिवसांपासून अनेक भागांत नळाला पाणी आले नसल्याने महिलांना पाण्यासाठी वणवण भटकावे लागत असल्याची खंत नागरिकांनी व्यक्त केली. विशेष म्हणजे, नागरिकांच्या या आंदोलनावेळी नगरपरिषदेचे सत्ताधारी किंवा विरोधी पक्षाचे एकही नगरसेवक उपस्थित नसल्याने लोकप्रतिनिधींच्या भूमिकेवर प्रश्नचिन्ह उपस्थित करण्यात आले. संभाव्य तणावाच्या पार्श्वभूमीवर महावितरण कार्यालय परिसरात पोलिसांचा चोख बंदोबस्त ठेवण्यात आला होता. यावेळी उबाठा शिवसेनेचे जिल्हा उपप्रमुख गणेश गिरी, तालुकाप्रमुख मारोती कागेरु, माजी नगरसेवक संजय पवार, वंचित बहुजन आघाडीचे सरचिटणीस गौतम देवके, जी. पी. मिसाळे, गंगाधर धडेकर, भगवान कांबळे यांच्यासह असंख्य नागरिक उपस्थित होते.

# साहेबराव कांबळे यांचा शिवसेनेत प्रवेश

उमरखेड/प्रतिनिधी- यवतमाळ विधान परिषदेच्या निवडणुकीतील काँग्रेसचे उमेदवार साहेबराव कांबळे यांनी उमेदवारी मागे घेण्याच्या दिवशी आपला उमेदवारी अर्ज मागे घेवून सर्वांना धक्का दिला. आता साहेबराव कांबळे यांनी भगवा झेंडा हाती घेतला असून उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या उपस्थितीत रविवारी शिवसेनेत प्रवेश केला आहे.

काँग्रेस व महाविकास आघाडीच्यावतीने यवतमाळ स्थानिक स्वराज्य संस्था



मतदार संघातून साहेबराव कांबळे यांना उमेदवारी देण्यात आली होती. कांबळे यांनी अखेरच्या क्षणी उमेदवारी मागे घेतल्याने या मतदारसंघातून शिवसेना (शिंदे) गटाचा उमेदवार बिनविरोध निवडून आला आहे. साहेबराव कांबळे यांनी दगाफटका केल्याने त्यांच्या विषयी तीव्र नाराजी पसरली होती. काँग्रेस हायकमांडने याची गंभीर दखल घेवून साहेबराव कांबळे यांची हकालपट्टी केली. रविवारी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, यवतमाळचे पालकमंत्री संजय राठोड यांच्या उपस्थितीत साहेबराव कांबळे व त्यांच्या समर्थकांनी शिवसेनेत प्रवेश केला आहे.

## प्रोजेक्ट एक्सचा पुण्यात भांडाफोड! तरुणांच्या हायप्रोफाईल पार्टीवर पोलिसांचा छापा

पुणे:शहरातील पब आणि नाईटलाइफवर पोलिसांची करडी नजर असताना, पुण्याबाहेरील ग्रामीण भागात सुरू असलेल्या एका हायप्रोफाईल बेकायदेशीर पार्टीचा पुणे गुन्हे शाखेने पर्दाफाश केला आहे. लोणीकंद पोलीस ठाण्याच्या हद्दीतील तुळापूर परिसरातील एका आलिशान बंगल्यात आयोजित करण्यात आलेल्या प्रोजेक्ट एक्स या हाऊस पार्टीवर छापा टाकून पोलिसांनी ७८ जणांविरुद्ध गुन्हा दाखल केला असून संबंधित बंगला सील करण्यात आला आहे. कारवाईदरम्यान पोलिसांना मोठ्या प्रमाणात नियमांचे उल्लंघन झाल्याचे आढळून आले. रात्री उशिरापर्यंत मोठ्या आवाजात संगीत वाजवण्यासाठी वापरण्यात आलेली तब्बल १ कोटी ४ लाख रुपयांची डीजे साऊंड सिस्टिम जप्त करण्यात आली. तसेच, बेकायदेशीररीत्या विक्री व सेवा करण्यात येत असलेले सुमारे १० लाख रुपयांचे विदेशी मद्यही पोलिसांच्या हाती लागले.या पार्टीमध्ये अमली पदार्थांचा वापर झाल्याचा संशय व्यक्त करण्यात येत आहे. कारवाईदरम्यान अनेक तरुण-तरुणी नशेच्या अवस्थेत आढळून आल्याने संशयित २३ जणांचे रक्ताचे नमुने तपासणीसाठी पाठविण्यात आले आहेत. फॉरेन्सिक अहवाल आल्यानंतर अमली पदार्थविरोधी कायद्यानुसार आणखी गंभीर कलमे लावली जाण्याची शक्यता पोलिसांनी व्यक्त केली आहे.

# मृग नक्षत्राच्या प्रारंभीच माहूर तालुक्यात पावसाची हजेरी

माहूर/प्रतिनिधी-मृग नक्षत्राच्या पूर्वसंध्येला आज रविवारी दुपारी ३ वाजण्याच्या सुमारास तालुक्यातील वाई बाजारसह परिसरात वादळी वाऱ्यासह मुसळधार पावसाने दमदार हजेरी लावली. अचानक आलेल्या पावसामुळे नागरिकांची एकच तारांबळ उडाली.

वादळी वाऱ्याचा वेग प्रचंड असल्याने अनेक ठिकाणी मोठी झाडे उन्मळून पडली, तर काही ठिकाणी विजेचे खांबही कोसळल्याची माहिती मिळाली. तसेच अनेक घरांवरील टिनपत्रे वाऱ्याने उडून गेल्याने नागरिकांचे मोठे नुकसान झाले आहे. वादळ आणि पावसामुळे परिसरातील वीजपुरवठा खंडित झाला असून वृत्त लिहिपर्यंत अनेक भागांमध्ये वीज सेवा पूर्ववत झालेली नव्हती. त्यामुळे नागरिकांना अंधारासह विविध अडचणींचा सामना करावा लागत आहे. मृग नक्षत्राच्या



प्रारंभीच झालेल्या या दमदार पावसामुळे शेतकऱ्यांमध्ये समाधानाचे वातावरण निर्माण झाले असले, तरी वादळी वाऱ्यामुळे कच्च्या घरांचे आणि इतर मालमत्तेचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाल्याने नागरिकांमध्ये चिंता व्यक्त केली जात आहे. प्रशासनाकडून नुकसानग्रस्त भागांचा पंचनामा करून मदत देण्याची मागणी नागरिकांकडून होत आहे.

# 'ममतां'च्या दोन खासदारांचा राजीनामा
## तृणमूल काँग्रेसमध्ये मोठ्या बंडाची चर्चा

नवी दिल्ली:पश्चिम बंगालमधील राजकीय आव्हानांनंतर आता तृणमूल काँग्रेसच्या प्रमुख आणि पश्चिम बंगालच्या माजी मुख्यमंत्री ममता बॅनर्जी यांना दिल्लीतही मोठा धक्का बसला आहे. तृणमूल काँग्रेसचे दोन राज्यसभा खासदारांनी आपल्या पदाचा राजीनामा दिल्याने पक्षात खळबळ उडाली आहे. खा.सुखेंदू शेखर रॉय आणि खा.कोयल मलिक यांनी राज्यसभा सदस्यत्वाचा राजीनामा दिला असून, यापैकी रॉय यांनी पक्षाचाही राजीनामा दिल्याची माहिती समोर आली आहे. सुखेंदू शेखर रॉय यांनी आपल्या राजीनाम्यामागे पक्षातील कथित भ्रष्टाचार आणि नेतृत्वाविषयीची नाराजी हे कारण असल्याचे स्पष्ट केले आहे. भ्रष्टाचाराच्या मुद्द्यावर उघडपणे भूमिका घेतल्यामुळे पक्षात आपल्याला एकटे पाडण्यात आले, असा गंभीर आरोप त्यांनी केला. राज्यसभा अध्यक्षांकडे त्यांनी आपला राजीनामा सादर केला आहे.राजीनाम्यानंतर रॉय यांनी तृणमूल काँग्रेसवर थेट निशाणा साधत बंगालमधील विविध शहरांतील कथित भ्रष्टाचाराचे फॉरेन्सिक ऑडिट करण्याची मागणी केली. गेल्या पाच वर्षांत राज्यभरात झालेल्या आर्थिक गैरव्यवहारांची स्वतंत्र चौकशी व्हावी,असे ते म्हणाले. तसेच, बंगालमधील जनतेत सरकारविरोधात वाढलेल्या असंतोषाकडेही त्यांनी लक्ष वेधले.इंडिया आघाडीच्या भवितव्यावरही प्रश्नचिन्ह उपस्थित करत रॉय यांनी या आघाडीला उज्ज्वल भविष्य नसल्याचे मत व्यक्त केले.


# नगर परिषद कार्यालय, उमरी जि. नांदेड

E-mail ID: coumari1@gmail.com दुरध्वनी क्रं. 02467-244035

जा.क्रं.उनप/2026/920 दिनांक:-14/05/2026

## जाहीर आवाहन

उमरी नगर परिषद हद्दीतील नागरीकांना जाहीर आवाहन करण्यात येते की, प्रधानमंत्री आवास योजना 2.0 अंतर्गत घटक क्रमांक 2 प्रतीकृती क्रमांक 1 भागीदारी तत्त्वावर परवडणारी घरे (AHP) अन्वये ज्या लाभार्थ्यांकडे स्वताःच्या मालकीची जागा नाही अशा नागरीकांनी घरकुलासाठी खालील प्रमाणे पात्र असणा-यांनी अर्ज करावे.

**पात्र लाभार्थी :-**

1) लाभार्थी कुटुंबामध्ये, पती-पत्नी व अविवाहित मुले / मुली (Children) (वय वर्षे 18 खालील मुले / मुली) यांचा समावेश असेल.

2) या योजनेंतर्गत अनुदान / सहाय्य प्राप्त करुन घेण्याकरीता शहरी भागात राहणाऱ्या EWS/LIG/MIG कुटुंबातील कोणत्याही सदस्यांच्या नावावर देशाच्या कोणत्याही भागात पक्के घर (All Weather House) नसावे.

3) लाभार्थ्याने गेल्या 20 वर्षात कोणत्याही शासकीय योजनेचा लाभ घेतलेला नसावा.

उपरोक्त पात्र लाभार्थ्यांनी सर्व दस्तावेजांसह नगर परिषद कार्यालयास दि.18/05/2026 ते दि.10/06/2026 कालावधी मध्ये अर्ज सादर करावे.

स्वा/- (सौ. शकुंतला भगवान मुदीराज) अध्यक्षा नगरपरिषद उमरी जि. नांदेड

स्वा/- (कैलास श्रीनिवासराव देशमुख) उपाध्यक्ष नगरपरिषद उमरी जि. नांदेड

स्वा/- (गणेश रामचंद्र चाटे) मुख्याधिकारी नगरपरिषद उमरी जि. नांदेड


पान १ वरुन

### केंद्र सरकारविरोधात...

सातत्याने होत असलेल्या त्रुटी चिंताजनक असल्याचे नेत्यांनी नमूद केले. देशातील आर्थिक परिस्थिती, वाढती महागाई आणि बेरोजगारीचा प्रश्नही बैठकीत चर्चेचा केंद्रबिंदू ठरला. रोजगारनिर्मितीबाबत केंद्र सरकार अपयशी ठरल्याचा आरोप करत या विषयावर सर्वपक्षीय बैठक बोलविण्याची मागणी करण्यात आली. तसेच शेतीमालाला हमीभाव, उत्पादन खर्चात वाढ आणि नैसर्गिक संकटांमुळे अडचणीत सापडलेल्या शेतकऱ्यांच्या प्रश्नांकडे केंद्र सरकारने तातडीने लक्ष द्यावे, अशी भूमिका इंडिया आघाडीने मांडली. दरम्यान, इंडिया आघाडीची पुढील बैठक ८ ऑगस्ट रोजी हैदराबाद येथे घेण्याचा निर्णयही या बैठकीत घेण्यात आला. आगामी काळात जनतेच्या प्रश्नांवर संयुक्त आंदोलन उभारणे, संसदेत समन्वयाने भूमिका मांडणे आणि केंद्र सरकारवर राजकीय दबाव वाढविण्यासाठी सर्व घटक पक्षांनी एकत्रितपणे काम करण्याचा निर्धार व्यक्त केला. लोकसभा निवडणुकीनंतर विरोधकांची ही पहिली मोठी आणि व्यापक बैठक मानली जात असून, या बैठकीतून केंद्र सरकारविरोधात अधिक आक्रमक भूमिका घेण्याचे संकेत देण्यात आले आहेत. आगामी निवडणुकांच्या दृष्टीने विरोधकांची एकजूट कायम ठेवण्याचा प्रयत्न या बैठकीतून स्पष्टपणे दिसून आल्याची चर्चा राजकीय वर्तुळात सुरू आहे.

### विषमता विरोधी लढ्यात...

समाजाची राजकीय भूमिका काय असावी यावर अभ्यासपूर्ण भाष्य केले असून, या विषयावर व्यापक चर्चा होणे आवश्यक असल्याचेही पानसरे यांनी सांगितले. यावेळी बोलताना ॲड. प्रदीप नागापूरकर म्हणाले की, आता केवळ मुस्लीम समाजालाच नव्हे तर सर्वच घटकांना आपला राजकीय अजेंडा ठरवण्याची गरज निर्माण झाली आहे. सर्वसामान्यांच्या मनात राजकारणाबाबत जाणीवपूर्वक संभ्रम निर्माण करून काहीजण स्वतःच्या राजकीय स्वार्थाची पोळी भाजत आहेत. या प्रवृत्तीविरोधात सर्वांनी एकत्र येणे आवश्यक असून, राजकारण हे सर्वसामान्यांच्या हिताचे असले पाहिजे, असे त्यांनी सांगितले. बालाजी वितवार यांनी फारुख अहमद यांच्या अभ्यासपूर्ण लेखन शैलीचा गौरव केला. अध्यक्षीय समारोपात बालाजी थोटवे यांनी 'मुसलमानों का सियासी अजेंडा' हे पुस्तक सर्वसामान्यांना अंतर्मुख करणारे असून समकालीन राजकीय वास्तवाचा विचार करण्यास भाग पाडणारे असल्याचे मत व्यक्त केले. परिसंवादास विविध क्षेत्रातील कार्यकर्ते, साहित्यप्रेमी आणि सामाजिक कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे सुत्रसंचलन शेख सर यांनी केले.

### काँग्रेसचे गटनेते अमित आरसुळ...

एका प्रकरणांत चांगलीच कोंडी करण्याचा प्रयत्न केला होता, अशी माहिती राजकीय सूत्रांनी दिली. आता त्याच खा. नागेश पा. आष्टीकर यांचे सुपुत्र महाविकास आघाडी कडून उमेदवार असल्याने, जुना हिशोब चुकता करण्यासाठी तर माजी नगराध्यक्ष व सध्याचे काँग्रेसचे गटनेते अमित आरसूळ यांनी अब आयेगा मजाचा बाण सोडला तर नाही ना? अशी जोरदार चर्चा हदगांव तालुक्यात चर्चा सुरू आहे. हदगाव नगर परिषदेचे 'पक्षीय बलाबल' ठरणार कळीचा मुद्दाया निवडणुकीत हदगाव नगर परिषदेतील नगरसेवकांची मते अत्यंत निर्णायक ठरणार आहेत. सध्या नगर परिषदेतील २३ मतदारांचे पक्षीय बलाबल पुढील प्रमाणे आहे. नगरसेवक संख्या शिवसेना (ठाकरे गट) ७, शिवसेना (शिंदे गट) ६, काँग्रेस (महाविकास आघाडी ५), दोन स्विकृत सदस्य आहेत. अमित आरसूळ हे काँग्रेसचे गटनेते आहेत. अशा परिस्थितीत त्यांचे हे सूचक स्टेटस महाविकास आघाडीच्या अधिकृत उमेदवाराची डोकेदुखी वाढवणारे ठरू शकते.

हे वृत्तपत्र प्रकाशक, मालक व संपादक प्रदिप अनंतराव नागापूरकर यांनी मुद्रक अब्दुल गफुर अब्दुल रझाक यांच्या सिमा प्रिंटींग ॲण्ड लिथो प्रिंटींग प्रेस इतवारा बाजार नांदेड, ता.जि.नांदेड येथे छापून नागापूरकर हाऊस, हाऊस नं.१-१०-६९३, विनायकनगर, नवा मोंढा, ता.जि.नांदेड-२ येथे प्रकाशीत केले.आर. एन. आय. नं. ४७१३५/८८ E-mail: nandedwarta@mail.com, मो.९४२२१७४७७४